

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
**संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ**

संदर्भ क्र.विकमं/२०१४–१५/१४६ दिनांक : ०२/०७/२०१४

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
सर्व महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या सभेबाबत....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधून नियुक्त करण्यात आलेले विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची सभा **शनिवार, दिनांक १२ जुलै, २०१४ रोजी, सकाळी १०.३० वाजता, संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेसाठी खालीलप्रमाणे विषय असतील.

१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास योजना मान्यता देणे व कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा ॲडव्हान्स महाविद्यालयाच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.
**(टिप : या विभागाचे पत्र क्र. विकमं/२०१३–१४/२३७, दि ०५/०८/२०१३ व विकमं/२०१४–१५/०५५, दि. २६/०६/२०१४ नुसार ज्या महाविद्यालयांनी/संस्थांनी विहित नमुन्यात बँक खात्याबाबतची माहिती दिलेली नाही. त्यांना विद्यार्थी कल्याण मंडळाच्या कोणत्याही प्रकारची देय रक्कम देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.)**

२. शैक्षणिक वर्ष २०१४–१५ मधील विविध उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.

३. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या इतर योजना या शैक्षणिक वर्षात राबविणेबाबत मार्गदर्शन करणे.

आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस **शनिवार, दिनांक १२ जुलै, २०१४ रोजी, सकाळी १०.०० वाजता नांव–नोंदणीकरीता** उपस्थित राहणेबाबत सूचित करावे तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी आपला प्रतिनिधी पाठवू नये, ही विनंती.

कळावे,

आपला,

(डॉ. पंडित एन. शेळके)
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

(टिप : **या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०१३–१४/९०७, दि. ०४/०६/२०१४** नुसार जर आपल्या महाविद्यालयाने विविध योजना व इतर उपक्रमांचे प्रस्ताव सादर केलेले नसतील, त्यांनी सदरचे प्रस्ताव त्वरित सादर करावेत. जेणेकरुन या प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.)